D:\APA 1 backup (2016 to 2020)\APA-2022\Letter 2022.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

## कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


**वाचा :** १. सहसंचालक (प्रशासन) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पुणे यांचे पत्र जा. क्र. मृकप/आस्था-०३/९०४/२०२२ दिनांक १२.०४.२०२२

२. विद्यापीठ परिपत्रक क्र.२०२२/प्र.क्र.११९४/आस्था-१/१७५० दिनांक २५/०४/२०२२

**विद्यापीठ परिपत्रक क्र.२०२२/प्र.क्र.११९४/आस्था-१/** 3162

कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, परभणी

दिनांक : २७ / ०७ /२०२२

परिपत्रक :-

शासन निर्णय दि. २४.०८.२०१८ अन्वये शासन शुध्दीपत्रक दि.२०.०९.२०१० रद्य करण्यात आल्याने कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांना रक्कमेचे अतिप्रदान झाल्याने अतिप्रदानाची वसुली करण्यास शिक्षकवर्गीय अधिकाऱ्यांनी नकार दर्शवुन वसुली विरोधात मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली आहे. त्यामुळे शासन निर्णय दि.१२.०८.२०२१ मध्ये वसुली विरोधात मा. उच्च न्यायालयात गेलेल्या अधिकाऱ्यांना मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती न करण्याबाबत सुचित केले आहे. त्याचाच एक भाग म्हणुन सहाव्या वेतन आयोगात अतिप्रदान झालेली रक्कम भरण्यास तयार असलेले आणि न्यायालयीन प्रकरणातुन माघार घेतलेल्या अधिकाऱ्यांची माहीती कृषि परिषदेस पाठविण्याबाबत संदर्भीय १ वरील पत्रान्वये सादर करण्याबाबत कळविले आहे.

त्यानुषंगाने विद्यापीठातील सहाव्या वेतन आयोगात अतिप्रदान झालेली रक्कम भरण्यास तयार असलेले आणि न्यायालयीन प्रकरणातुन माघार घेण्यास तयार असलेल्या अधिकाऱ्यांनी त्याबाबतचा अर्ज/हमीपत्र या कार्यालयास दि.२९.०४.२०२२ पर्यंत सादर करण्याबाबत संदर्भीय २ वरील परिपत्राकान्वये कळविले होते. परंतु अद्याप पर्यंत केवळ दोन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज/हमीपत्र या कार्यालयास सादर केले आहे.

तेंव्हा पुःनश्च सदर परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सहाव्या वेतन आयोगात अतिप्रदान झालेली रक्कम भरण्यास तयार असलेले आणि न्यायालयीन प्रकरणातुनं माघार घेण्यास तयार असलेल्या अधिकाऱ्यांनी त्याबाबतचा अर्ज/हमीपत्र या कार्यालयास दि.१०.०८.२०२२ पर्यंत या कार्यालयास सादर करावेत. जेणे करुन सदरील अर्ज कृषि परिषदेस सादर करता येतील. तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी अर्ज/हमीपत्र सादर केले नाहीत त्या कर्मचाऱ्यांचे कोणतेही आर्थिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कर्मचाऱ्यांची राहिल याची नोंद घ्यावी.

तसेच सर्व कार्यालय प्रमुखांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व संबंधीताच्या निर्देशनास आणुन त्यांची स्वाक्षरी घ्यावी. सर्वांच्या निदर्शनास आणल्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

**मा.कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने...**

**(धिरजकुमार रा.कदम)**
कुलसचिव

**प्रत :**

१) संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/ संचालक संशोधन/ संचालक विस्तार शिक्षण संचालनालय, वनामकृवि, परभणी यांना देऊन सुचित करण्यात येते की, सहाव्या वेतन आयोगात अतिप्रदान झालेली रक्कम भरण्यास तयार असलेले आणि न्यायालयीन प्रकरणातुन माघार घेण्यास तयार असलेल्या अधिकाऱ्यांना सदरील परिपत्रक निर्देशनास आणुन देऊन त्याबाबतची पोच आपल्या दप्तरी ठेवावी.

**प्रतिलिपी :**

१. मा.कुलगुरू महोदय यांचे खाजगी सचिव.

२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ६व्या वेतन आयोगात अतिप्रदान झालेल्या कर्मचाऱ्यांनी हमीपत्र/अर्ज सादर करनेबाबत या सदराखाली प्रसिध्द करण्यात यावे.